ता.२३/०८/२०१९

- प्रेसनोट -

## धारधार शस्त्रास्त्र व छऱ्याचे पिस्टल बाळगुन धमकी देणाऱ्या सराईत गुंडास अटक

---

दि.२२/०८/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उप- निरिक्षक सुबराव लाड व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी सर्फराज देशमुख व राहुल तावे यांना त्याच्या खास बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, आकाश थोरात हा रेकार्ड वरिल आरोपी हा सच्चाई माता मंदीराच्या पाठीमागे हातामध्ये कोयत्या सारखे हत्यार घेवुन फिरत आहे. अशी बातमी मिळाल्याने सच्चाई माता मंदीराच्या शेजारी पाण्याचे टाकीजवळ गेलो असता रेकार्ड वरिल आरोपी आकाश थोरात हा हातामध्ये लोखंडी कोयता घेवुन फिरत असल्याचे दिसला. त्याची व आमची नजरानजर हाताच तो आम्हास पाहुन पळुन जावु लागल्याने त्यास १८.०० वा सुमारास लोखंडी कोयत्यासह ताब्यात घेवुन त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता आकाश भरत थोरात, वय २३ वर्षे. रा.सच्चाईमातानगर परदेशी बिल्डींग रुम नं.०२ आंबेगाव खुा पुणे असे सांगितले. त्याच्या अंगझडतीत कमरेला खोचलेला एक कि रु २००/- रु चा लोखंडी कोयता मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे त्याने दोन दिवसापुर्वी इसम नामे नागेश राजु चव्हाण, रा. पोल नं.११ जवळ, सच्चाईमातानगर, साईबाबा मंदिराजवळ, अटल ११, पुणे याला जो पिस्टल दाखवुन शिवीगाळ व धमकी दिली त्याबाबत चौकशी करता त्याने त्याच्या घरात लपवुन ठेवलेले छऱ्याचे पिस्टल काढुन दिले असुन ते जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपी त्याच्यावर बेकायदेशीर हत्यार बाळगले प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री श्रींकात तरवडे, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री शिरीष सरदेशपांडे सो, सहा. पोलीस आयुक्त श्री मालोजीराव पाटील सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, सर्फराज देशमुख, राहुल तांबे, सचिन पवार, कुंदन शिदे, गणेश चिचंकर, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, अभिजीत जाधव, योगेश सुळ यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.

Scanned by CamScanner